# राशिभविष्य - मार्च, २०२३.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==================================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

==================================================================

**(१) मेष -** या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत रवि -बुध -शनि असे तीन ग्रह असून येथील शनि सर्वसाधारणपणे अनुकुल होईल, अर्थवाढ होणेही संभवते, पण मुलांपैकी कोणास कसला तरी त्रास असल्याचे दिसून येईल. येथील रवि -बुध महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल व लाभदायक होतील, सुखसमाधान लाभेल; पण महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत गेल्यावर प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल, अकारण शरीरपीडा करून घ्याल व मानभंग होणे संभवते. हाती घेतलेल्या कामात अपयश येईल. शिवाय अनारोग्य होणेही संभवते. या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु -नेपच्यून असे दोन ग्रह आहेतच. येथील गुरु अध्यात्म व सामाजिक कार्य यांची मनापासून आवड असणारांना अनुकुल होईल व त्याच्यामुळे सामाजिक कार्य व उपासनेद्वारे आध्यात्म यांत प्रगती होईल. पण त्याच्यामुळे कौटुंबिक त्रास व प्रवासात त्रास होणे संभवते. नेपच्यूनमुळे नैराश्य येणे संभवते. पण तो गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल, सुखकारक व लाभदायकच होईल. या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत राहू व हर्षल असून येथील राहूमुळे अपमान झाल्यास सूडबुद्धी प्रबळ होईल. शिवाय वातविकाराचा आजार त्रस्त करीतसे दिसते. येथील हर्षलमुळे स्वभाव, अस्थिर, लहरी, चंचल असा होणे संभवते. त्यामुळे कोणाचाही धाक, दडपण सहन होणार नाही. पण तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो महिन्याच्या

उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी मिथुन राशीत जात आहे, अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे डोळ्याचे व घशाचे अनारोग्य, आर्थिक समस्या व चिंता त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या तृतीय स्थानी मिथुन राशीत गेल्यावर अनुकुल होईल, आत्मविश्वास, धैर्य, हिंमत, महत्वाकांक्षा वाढेल, हातून कर्तृत्व घडेल. शिवाय प्रवासयोग येणेही संभवते. पण त्याच्यामुळे इजा, दुखापत होणेही संभवते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर होणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यताही दिसते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी "ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः:' तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत मंगळ असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या धनस्थानी मिथुन राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे स्वभाव हट्टी व अहंकारी होईल, त्यामुळे अकारण श्रम, दगदग कराल, नोकरदार मंडळींना नोकरीत तो प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. त्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत केतु असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आचारविचार उच्च होतील, सगळीकडे सहकार्य लाभेल, आरोग्य उत्तम राहील. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत शनि -रवि -बुध असे तीन ग्रह असून येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत हे दोन्ही ग्रह सर्व प्रकारच्या नोकरी -व्यवसाय असणारांना अनुकुल, लाभदायक व सुखकारक होतील. काही मंडळींचा सन्मान होईल तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. येथील शनि चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना तसेच वकिली व्यवसाय असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. शिवाय काही मंडळींना प्रवासाचे योग येतील. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु -शुक्र-

नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. येथील गुरुमुळे इच्छाआकांक्षा पूर्ण होतील, नोकरी-व्यवसायात प्रगती होईल, विवाहेच्छूचे विवाहयोग जुळून येतील. व नवे मित्र मिळतील. पण नेपच्यूनमुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील व कुमार्गी मित्रांमुळे नैराश्य येणे संभवते. ,येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याचा संपूर्ण काळात अनुकुल व सुखकारकच होईल. या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू व हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे दिखाऊ आचरण होईल; पण तो धनदायक होणेही संभवते. पण येथील हर्षल प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे नोकरी-व्यवसायात अडचणी निर्माण होतील व आर्थिक समस्या त्रस्त करतील, बेअब्रूचे प्रसंग येणेही संभवते. शिवाय अकारण शत्रुत्व होणे व अपघात होणेही संभवते. श्रद्धा असेल तर “श्रीशिवशंकरा”ची व “श्रीहनुमाना”ची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज रकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ओम ब्रह्माय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे स्वभाव अहंकारी, हट्टी होईल व अनारोग्य, आर्थिक चिंता, वाद, भांडणे, अकारण दगदग,परिश्रम करणे, नोकरदार मंडळींना नोकरीत मनस्तापदायक आचरण सहन करावे लागणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत केतू असून तो अध्यात्मिक उपासनेची आवड असणारांना व गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत रवि -बुध -शनि असे तीन ग्रह असून येथील शनि वकिली,चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत जात आहेत. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे भय, मानसिक ताण, वडील मंडळींचा विरोध, भांडणे, नियोजित कार्यात अडथळे, अडचणी येणे, दिरंगाई होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह या राशीच्या दशम स्थानी मींन राशीत गेल्यावर अनुकुल

होतील व मानसिक व कौटुंबिक  सुखसमाधान लाभेल, नवे मित्र मिळतील, नोकरी-व्यवसायात काही मनोनुकुल घटना  घडतील, आर्थिक लाभ होतील, काही मंडळींना  नोकरीत बढती, काहींचा  सन्मान होईल, तर क्वचित कोणास एखादे  उच्च पदही  मिळण्याची शक्यता दिसते. या राशीच्या दशम स्थानी मीन  राशीत प्रथमपासून गुरु-शुक्र नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. पैकी येथील गुरु बौद्धिक नोकरीव्यवसाय असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल.येथील   नेपच्यूनमुळे मनस्थिती अस्थिर होईल'; पण तो मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थसंबंधी व्यापार-व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात  या राशीच्या लाभस्थानी  मेष राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात कलात्मक व्यवसाय असणारांना प्रतिकुल होईल व महिन्याच्या उत्तरार्धात   त्याच्यामुळे सुख,शांती,समाधान लाभेल. धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू व हर्षल असे दोन ग्रह आहेतच. येथील राहूमुळे अधिकार पद असणारांना  वाम मार्ग धन मिळविण्याचा मोह होईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून सरळ मार्गानेच नोकरी करावी. तेच सुखाचे होईल. जुगाराचा नाद असणारांनीही मनावर ताबा ठेवून  मोह टाळावा. नपेक्षा आर्थिक नुकसानच होईल. जपा. येथील हर्षलमुळेही निश्चित असे काय घडेल ते सांगता येत नाही. पण त्याच्यामुले वाद, भांडणे, शत्रुत्व निर्माण होणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीभगवान विष्णूची उपासना व श्रीहनुमानाची  उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने  "विष्णुसहस्रनाम  स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोमसोमाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी "ओंम: नमः: शंकराय" " तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसु आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" तारक  मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या  राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा  राशीत केतू असून त्याच्यामुळे घरात कोणाशी  पटणार नाही. कसली  तरी चिंता अस्वस्थ करील. शिवाय तो विषभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ  राशीत रवि -बुध -शनि  असे तीन ग्रह असून  येथील शनि प्रतिकुल असून त्याच्यामुळे अनारोग्य, दुःख, दैन्य व प्रतिकुल घटना घडणे संभवते. जपा. येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत  येथील रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे इच्छा- आकांक्षा अपूर्ण राहणे, अनारोग्याचा त्रास

होणे, संततिसुखात बाधा येणे, हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे, मानसिक ताण सहन करावा लागणे, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागणे संभवते. त्यामुळे नैराश्य येणेही संभवते. येथील बुध महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे कार्यसिद्धी होईल व सुखसमाधान लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत गेल्यावर त्याच्यामुळे वाद, भांडणे, नियोजित कार्यात अडथळे, अडचणी येणे, दिरंगाई होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु- शुक्र-नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. पैकी शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत जात आहे. त्यामुळे तो महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल व सुखकारक होईल व त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना गुरुकृपा तर काही मंडळींना थोरकृपा प्राप्त होईल. काही मंडळींना कीर्ती, प्रसिद्धी मिळणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांच्या कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी मीन या स्वराशीत असलेल्या गुरु आणि नेपच्यूनमुळे अध्यात्माची मनापासून ओढ असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींचा उत्कर्ष होईल, काहींना प्रसिद्धी मिळेल, प्रवासाचे योग येतील. तसेच नेपच्यूनमुळे काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मळेल. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत राहू व हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे नोकरीत काही मंडळींना अधिकार पद मिळण्याची शक्यता दिसते. तसेच काही मंडळींचा सन्मान होणेही संभवते. येथील हर्षलही उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी मिथुन राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील, मित्रांशी वितुष्ट येणे संभवते, कष्ट, परिश्रम करूनच अर्थप्राप्ती होईल, चिंता, भय अस्वस्थ करील व भांडणे होणे संभवते. पण त्याच्यामुळे एखादी मौल्यवान वस्तू मिळणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसु आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी “ओम बृहस्पतये नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी “ओम सर्पाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या तृतीय स्थानी केतू असून त्याच्यामुळे मानसिक दुःख सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. पण या राशीच्या व्यापारीवर्गाला स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत रवि -बुध -शनि असे तीन ग्रह असून येथील शनिमुळे विवाहेच्छूना विवाहयोग संभवत नाही. पण त्याच्यामुळे चित्तवृत्ती शांत राहू शकेल. रवीमुळे अनारोग्य होणे संभवते. पण तो केन्द्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होणेही संभवते. येथील बुधामुळे दुःख, वाद, भांडणे होणे संभवते. पण येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर रवि प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे दुःख, अनारोग्य, नियोजित कार्यात अपयश, संतिसुखात बाधा येणे संभवते. पण बुधामुळे कार्यसिद्धी होईल व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या अष्टम स्थानी मीन या स्वराशीत गुरु -शुक्र नेपच्यून असे तीन ग्रह प्रथमपासून आहेतच. येथील गुरु-शुक्रामुळे या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने असा धनलाभ होऊ शकेल. पण येथील नेपच्यून जलभयकारक व विष- भयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. तसेच खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत जात आहे. त्या काळात त्याच्यामुळे सुख, ऐषाराम, सुसंगती लाभेल. काही मंडळींना गुरुकृपा तर काहींना थोरकृपा लाभेल. या राशीचा भाग्यस्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू व हर्षल असे दोन ग्रह आहेतच. येथील राहू फिरतीची नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. येथील हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी मिथुन राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो केवळ औषधविक्रेते व यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल होईल; पण इतरांच्या नोकरी-व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. नोकरीत कामाचा ताण व वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेलसे दिसते. स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. काही मंडळींना कष्ट-परिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती करावी लागेल. पण त्याच्यामुळे मौल्यवान वस्तूचा लाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीभगवान विष्णूची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "विष्णुसहस्रनाम स्तोत्रा"चे पठण करा. तसेच दररोज

सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या धनस्थानी याच राशीत केतू असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत शनि - रवि -बुध असे तीन ग्रह असून येथील शनि दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. पण गैरसमज, वाद, भांडणे अशापैकी कारणांनी मन अस्वस्थ होणे संभवते. येथील रवि -बुध महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होतील. रवि दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल व त्याच्यामुळे हितशत्रू पराभूत होतील, पण तो अनारोग्यकारक होणेही संभवते. बुधामुळे कार्यसिद्धी होईल, काही मंडळींना प्रसिद्धी मिळेल व धनलाभ होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हे दोनही ग्रह या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत गेल्यावर प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य, भांडणे, विरोध यांच्याशी मुकाबला करावा लागण्याची शक्यता दिसते. पण रवि केंद्रस्थानी असल्यामुळे तो भाग्योदयकारक होणेही संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु-नेपच्यून-शुक्र हे तीन ग्रह आहेतच. पण येथील नेपच्यून विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. असे असले तरी येथील स्वराशीतील गुरुमुळे या राशीच्या विवाहेच्छूना विवाहयोग येणे संभवते. प्रेमसंबंध असणारांचे प्रेमसंबंध दृढ होतील, नवे स्नेहसंबंध जुळून येईल, प्रवासयोग येईल व अर्थलाभ होणेही शक्य दिसते. येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुलच होईल व त्याच्यामुळे या राशीच्या विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल, प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. काही मंडळींना कमी श्रमात भरपूर अर्थलाभही होऊ शकेल. तसेच ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसाहक्काने असा अचानक धनलाभ होईल. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू व हर्षल असे दोन ग्रह आहेतच. पैकी येथील राहू अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे या राशीच्या काही अधिकारपद असणाऱ्या मंडळींना अधिकाराचा दुरुपयोग करून वाममार्ग धन कमावण्याचा मोह होईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून मोह काबूत ठेवावा. तेच सुखाचे होईल. येथील हर्षल अपघातकारक असल्यामुळे सतत सावधान राहून आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी

मिथुन राशीत जात आहे. अशा परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धात शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात मनस्ताप, मानहानी होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात तो केवळ औषध विक्रेते आणि यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल होईल. इतरांच्या नोकरी-व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. श्रद्‌धा असेल तर श्रीशिवोपासना व दुर्गादेवीची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्‌धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे व “दुर्गादेवी स्तोत्रा”चे पठण करा त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्‌धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ओम सूर्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतू असून तो सर्व प्रकारे सुखकारकच होईल. पण त्याच्यामुळे अपघात भय असल्यामुळे सतत सर्व ठिकाणी सावधानतेने आचरण करणेच अगत्याचे होईल. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत रवि -बुध - शनि असे तीन ग्रह असून येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत हे दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य, अपघात भय, संततीपैकी कोणाचे अनारोग्य, नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह अनुकुल व भाग्योदयकारक होतील. तसेच दशम या व्यवसाय स्थानास पूरक होतील. हितशत्रू पराभूत होतील, कार्यसिद्‌धी होईल व धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत असलेला शनि चिकित्सक बौद्‌धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, होईल; व त्याच्यामुळे चिकाटीने कार्य करणे शक्य होईल. पण त्याच्यामुळे स्वभाव स्वभाव संशयी, स्वार्थी होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु-शुक्र-नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. पैकी येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो कलात्मक कार्यक्षेत्र असणारांना प्रतिकुल होईल व कलागुण असूनही ते जगासमोर आणण्याची संधीच मिळणार नाही. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे या राशीच्या विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुख समाधान लाभेल, प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. गुरुमुळे आरोग्य उत्तम राहील व नोकरचाकराचे सुख लाभेल. पण येथील नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना उगीचच एखादी आजारभावना त्रस्त करील. तसेच काही मंडळींना

काल्पनिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना फसवणूक झाल्याचा मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू व हर्षल असे दोन राहू आहेतच. पण हे दोन्ही ग्रह वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीचा भाग्यस्थानी मिथुन राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे शारीरिक कष्ट, अनारोग्य, इजा होणे, हाडमोड होणे संभवते. तसेच तो जलभयकारक व वीजभयकारक असल्याने खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच विजेवर चालणारी उपकरणे सावधानतेने हाताळा. महिन्याच्या उत्तरार्धात शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात त्रास, मनस्ताप, अपमान सहन करावा लागेलसे दिसते. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिववलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी “ओम वायवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत रवि -बुध -शनि असे तीन ग्रह असून येथील रवि - बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, अपघात भय, कार्य दिरंगाई, दुःख, कौटुंबिक त्रास, आर्थिक चिंता, महिन्याच्या उत्तरार्धात संततीपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता, नोकरीत वरिष्ठांचा जाच अशापैकी घटना घडणे संभवते. बुध महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे गृहसौख्य व मित्रसुख लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो संततिसुखात बाधा निर्माण करीतसे दिसते. येथील शनि कौटुंबिक सुख व गृहसौख्य यांत बाधा निर्माण करील. त्यामुळे दुःख होऊन नैराश्य येणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु-शुक्र-नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. पण हे तिन्ही

ग्रह अनुकुल होतील व गुरु-नेपच्यून अध्यात्म व गूढ संशोधन यांची मनापासून आवड असणारांना अनुकुल होतील. व नेपच्यूनमुळे उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल, गूढ संशोधनाची ओढ असणारांनाही तो प्रगतिकारक होईल. येथील गुरुमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल, सर्व सुख मिळेल, अर्थलाभ होईल व ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते दृढ होतील. येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत जात आहे. त्यामुळे तो महिन्याच्या पूर्वार्धात सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेत प्रगती करण्यास अनुकुल होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व या राशीच्या कलाकारांना आपल्या कलेतील कर्तृत्व सिद्ध करण्यास संधीच मिळणार नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू व हर्षल असे दोन ग्रह आहेतच. येथील राहूमुळे ज्यांचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशा मंडळींना तो लाभदायक होईल. पण तो अनारोग्यकारक होणेही संभवते. तसेच येथील हर्षलमुळे ज्यांचे चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र आहे अशा मंडळींना डोकेदुखीचा किंवा मेंदूविकाराचा आजार होणे संभवते. म्हणून त्यांनी सतत अति खोल विचार करत बसू नये. काही मंडळींना मुदतीच्या तापाचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी मिथुन राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, हाडमोड होणे संभवते. तसेच तो जलभयकारक व वीजभय -कारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा. शिवाय त्याच्यामुळे विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणपतीची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणपति अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झो[पी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः:' तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत रवि -बुध -शनि असे तीन ग्रह असून येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत जात आहेत.अशा परिस्थितीत रवि

महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल, धनलाभ होईल, आरोग्य सुधारेल, शासकीय नोकरीत असणारांपैकी काही मंडळींना बढती, क्वचित कोणाचा सन्मान होईल, कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, कार्य दिरंगाई, दुःख, आर्थिक चिंता, कौटुंबिक त्रास अशापैकी घटना त्रस्त करण्याची शक्यता आहे. या उलट बुध महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते. तसेच हितशत्रूचा त्रासही सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर अनुकुल होईल व त्याच्यामुळे मित्रसुख व गृहसौख्य लाभेल, पण धननाश होणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत असलेल्या शनीमुळे काही मंडळींना अपेक्षित अशी उत्तम नोकरी मिळेल, काहींना आवडीचे कार्यक्षेत्र मिळेल, पण त्याच्यामुळे भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु-शुक्र- नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. पैकी गुरूमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार पार पडतील, पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. येथील शुक्रामुळे

शेतीवाडी असणारांना त्यापासून लाभ होईल व ऐषाराम लाभेल. पण येथील नेपच्यूनमुळे घरगुतीबाबत घोटाळे, गैरसमज निर्माण होण्याची शक्यता दिसते. येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत गेल्यावर सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेत प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू व हर्षल असे दोन ग्रह आहेतच. पैकी राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात व संततिसुखात बाधा येणे संभवते. पण येथील हर्षल उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल,प्रगतिकारक व यशदायक होईल. काही मंडळींना अंतर्ज्ञान प्राप्त होणेही संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी मिथुन राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य,दुखापत होणे, चोरी होणे, आर्थिक नुकसान होणे, अपप्रचाराचा त्रास होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. तसेच विवाहितांच्या वैवाहिक जीवनात दोघापैकी कोणाचे अनारोग्य, दोघातील वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी सुखात बाधा येणे संभवते. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशय, वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत केतु असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे ऐषाराम व सुखसमाधान लाभेल. प्रवासाचे योग येतील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल.

त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निॠतये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी " ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत रवि -बुध -शनि असे तीन ग्रह असून येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे आर्थिक संकटे, वित्त हानी, भांडणे, डोळ्याचे अनारोग्य होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य सुधारेल, धनलाभ होईल, सर्व सुखसमाधान लाभेल. पण येथील बुध संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे, हितशत्रूचा त्रास होणे संभवते. पण महिन्याच्या पूर्वार्धात त्याच्यामुळे धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या धनस्थानी असलेला शनि संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु-शुक्र-नेपच्यून हे तीन ग्रह आहेतच. हे तिन्ही ग्रह अनुकुलच होतील व
गुरुमुळे कुटुंबात शुभ घटना घडतील, प्रवास योग येईल, या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रसिद्ध होईल, पण एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. शुक्रही अनुकुल व लाभदायकच होईल व त्याच्यामुळे काही मंडळींना भूमिलाभ होईल, काहींना धनलाभ होईल, क्वचित कोणास मानाचे स्थान, प्रतिष्ठा असे काही प्राप्त होणे संभवते. येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल व अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच गूढ संशोधनात रुची असणारांना त्यांच्या कार्यात यश प्राप्त होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत जात आहे. त्या काळातही तो अनुकुल व लाभदायकच होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू व हर्षल असे दोन ग्रह आहेतच. पण हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे कशातही सुखसमाधान लाभणार नाही, कौटुंबिक त्रास वाढतील, पण उत्तरार्धात शुक्र या स्थानी आल्यावर परिस्थितीत बदल होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे संततिसुखात बाधा

येणे संभवते. तसेच अनारोग्य होणेही संभवते. काही मंडळींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करतील. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन राशीत गेल्यावर चोरी होणे, अपप्रचाराचा त्रास होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याचा मोह होईल. पण त्यांनी तो विचार मनातून काढून टाकावा. तेच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी " ओम विष्णवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि -बुध -शनि असे तीन ग्रह असून येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी मीन राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत हे तिन्ही ग्रह संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होणार असून त्यांच्यामुळे अनारोग्य, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होणे, कुटुंबातील प्रिय व्यक्तींचे स्थलांतर होणे, धननाश होणे, कुसंगतीची बाधा होणे, मनस्थिती अस्वस्थ, चंचल होणे, कसली तरी चिंता त्रस्त करणे, मनस्ताप होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु -शुक्र -नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. पैकी गुरु-शुक्रामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, कुटुंबात शुभ घटना घडतील, स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात प्रगती होईल. धनलाभ होणेही संभवते. येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत जात आहे. त्या वेळी त्याच्यामुळे काही मंडळींना भूमिलाभ होईल; तर काही शासकीय नोकरीत असणारांचा सन्मान होणेही संभवते. क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या धनस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळेहि आर्थिक संकटाना सामोरे जावे लागेल. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत प्रथमपासून राहू व हर्षल असे दोन ग्रह आहेतच. हे दोन्ही ग्रह अनुकुल होतील व

राहूमुळे मनस्थिती हरहुन्नरी व उदार होईल, हातून एखादे कर्तृत्व घडेल, पण त्याच्यामुळे बंधुसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल,

प्रगतिकारक व यशदायक होईल. आकलन शक्ती व स्मरणशक्ती वाढेल. वृत्ती चौकस होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी मिथुन राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे होणे संभवते. तसेच काही असमाधानकारक घटना घडण्याची शक्यताही दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे संततीपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाचे अयोग्य आचरण अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप होणे संभवते. काही मंडळींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे काही मंडळी धूर्त, दिखाऊ, ढोंगी आचरण करून काळ व्यतीत करण्याची शक्यता दिसते. शिवाय त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी “ओम वरुणाय नमः ” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत रवि -बुध -शनि असे तीन ग्रह असून येथील रवि -बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व शरीरपीडा, मानभंग, अनारोग्य. थकवा, मनस्ताप, चिंता, अपयश, धननाश, कुसंगती अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या व्ययस्थानी असलेला शनि सुद्धा प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे संकटपरंपरा कोसळेल. या राशीच्या प्रथम स्थानी प्रथमपासून गुरु-शुक्र-नेपच्यून हे तीन ग्रह आहेतच. पैकी नेपच्यूनमुळे मनस्थिती कोमल होईल, व मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच मन उदास होईल व नैराश्य येईल. गुरु-शुक्र हे दोन्ही ग्रह अनुकुल होतील व गुरुमुळे आरोग्य उत्तम राहील व तो बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. शुक्रामुळे सर्व सुखाचेच घडेल. येथील शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी मेष राशीत जात आहे. या राशीच्या धनस्थानी प्रथमपासून

राहू व हर्षल असे दोन ग्रह आहेतच. येथील राहूमुळे कुटुंबात कलह निर्माण होतील, व आर्थिक चिंता त्रस्त करतील. हर्षलमुळे मनस्थिती अति अस्थिर, चंचल होईल, अविचाराने आचरण होईल आणि आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे याची जाणीवही होणार नाही. पण महिन्याच्या उत्तरार्धात शुक्र या स्थानी आल्यावर सुखशांती निर्माण होईल. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी मिथुन राशीत जात आहे. त्यामुळे तो महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल, व त्याच्यामुळे महत्त्वाकांक्षा वाढेल, हातून कर्तृत्व घडेल; पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर कुटुंबात असमाधानकारक घटना घडतील, गैरसमज, वाद, भांडणे होण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत केतु असून तोही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक व संततिसुखात बाधा येणे संभवते. शिवाय तो अनारोग्यकारक होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अहिर्बुध्न्याय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी "ओम पूषाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====ooooo0ooooo=====